महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: सीबीटी-०६२२/प्र.क्र.११/२०२२/३१ दिनांक – २१ जून, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय** :-दिव्यांग व्यक्तींना परीक्षेच्यावेळी सहायक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग उमेदवार संगणक प्रणालीवर आधारित परीक्षा देण्यास सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे सहायक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी सहायकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

**२.** आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिरातींस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व सहायकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह **so-vpr@mpsc.gov.in** या ईमेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | संवर्ग | परीक्षेचा दिनांक | विनंती अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ७०/२०२२ | वैद्यकीय अधिकारी, गट-ब, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये | ०८ जुलै, २०२३ | ०२ जुलै, २०२३ |
| २ | ७१/२०२२ | वैद्यकीय अधिकारी, गट-ब, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (अलिबाग) | | |
| ३ | ७२/२०२२ | वैद्यकीय अधिकारी, गट-ब, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (सातारा) | | |

**३.** केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना सहायक आणि/अथवा भरपाई वेळेकरिता दावा केला म्हणून उमेदवारांना सहायक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच सहायक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.

**४.** उपरोक्त नमूद विहित वेळेत व प्राधिकृत ई-मेल आयडीवर पूर्व परवानगी साठी विहित पध्दतीने अर्ज सादर न केल्यास सहायक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहणार नाही.

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई